चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२३ जुन, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## ४ आरोपीकडुन ९ लक्ष ९० हजार ४७० रू चा मुदद्देमाल हस्तगत

दिनांक २२/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम टाटा सुमो वाहनाने एमआयडीसी पडोली दाताळा मार्गे चंद्रपुर कडे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथकाने तात्काळ महर्षी विद्यालय दाताळाच्या वळणाजवळ नाकेबंदी लावली असता काही क्षणातच मिळालेल्या वर्णनाची एक टाटा सुमो वाहन येतांना दिसले. सदर वाहनास थांबवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनाच्या मागच्या सिटच्या खाली एक विशेष छुपा कप्पा तयार करून त्यामध्ये दारूचा माल दिसुन आला. यामध्ये ९५० नग देशी दारू किं. ९५,०००/—रू, आणि एक वाहन एमएच ३४ ए ०८०४ किं. ४,००,०००/—रू असा एकुण ४,९५,०००/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदरचा गून्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे आशिष वसंत दरबेसवार वय ३० रा. महात्मा फुले चौक, बाबुपेठ चंद्रपुर यास अटक करण्यात आली आहे.

तसेच स्थागुशा पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीवरून जलनगर वार्ड चंद्रपुर येथे छापा टाकला असता, आरोपी नामे सागर सामकिशोर कंजर वय २६ रा. कंजर मोहल्ला चंद्रपुर याचे ताब्यात असलेले प्लास्टीक ड्रममध्ये गुळ आंबा सडवा आणि इतर साहीत्य असा एकुण ३५,४७०/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

दिनांक २३/०५/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीवरून एका चारचाकी टाटा इंडीका वाहन ताब्यात घेवुन १६ बॉक्स देशी दारूचा माल जप्त केला आहे. सदर दारूचा माल आणि एक टाटा इंडीका असा एकुण ४,६०,०००/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरिक्षक श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोहवा. संजय, राजेंद्र खनके, पोना. नागरे, अमजद, पोशि. प्रशांत यांनी पार पाडली.

———————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२३ जुन, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)


# घुग्घुस पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## ०४ आरोपींकडुन ७ लक्ष ७६ हजाराचा मुदद्देमाल हस्तगत

दिनांक २२/०६/२०२० रोजी घुग्घुस पोलीसांनी पोलीस स्टेशन हदद्दीत विशेष मोहिम राबवुन तिन गुन्हे नोंद करून एकुण ७,७६,६००/—रू चा मुदद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २२/०६/२०२० रोजी घुग्घुस पोलीसांनी मिळालेल्या गोपनीय माहिती वरून एक मारोती स्विफ्ट कार ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये १५ बॉक्स देशी दारू किं. १,५०,०००/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदर दारूचा माल आणि वाहतुकीकरीता वापरलेले वाहन किं. ५,००,०००/—रू, ०२ मोबाईल फोन ७,०००/—रू, असा एकुण ६,६६,०००/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करून ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

दुसरीकडे संशयावरून एक दुचाकी चालकास दुचाकीसह ताब्यात घेवुन झडती घेतली असता त्याचे ताब्यात २६ बॉटल विदेशी दारू, ३,६००/—रू आणि एक बाईक किं. ५०,०००/—रू असा एकुण ५३,६००/—रू चा मुदद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरच्या गुन्हयात ०२ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

तसेच मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एक दुचाकी ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता १५० बॉटल देशी दारूचा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि एक दुचाकी असा एकुण ५७,०००/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचे तिन्ही गुन्हे पोलीस स्टेशन घुग्घुस येथे नोंद करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन घुग्घुस प्रभारी सहायक पोलीस निरिक्षक श्री. चहांदे यांचे नेतृत्वात पोउपनि. आमटे, पोना. सचिन, विनोद, महेश, सुधिर, पोशि. सचिन बोरकर, शार्दुल, निलेश, रणधिर यांनी पार पाडली.

———————————————————————————————